केवळ खाजगी वितरणाकरिता

खंड ४ अंक १ जानेवारी २०११

श्री राम चंद्र मिशन

# Echoes India

ONE WORLD ONE HUMANITY

2011



## हैदराबाद – दि. ११ ते १८ नोव्हेंबर

दि. ११ नोव्हेंबरच्या सकाळी हैदराबाद अंतर्राष्ट्रीय विमानतळावर पू. गुरुदेवांचे आगमन झाले. तेथून सरळ त्यांनी २० कि.मी. अंतरावर असलेल्या 'कान्हा शांती वनम' प्रकल्पाकडे प्रस्थान केले. झाडांनी वेढलेल्या आणि झाडाखाली बांधलेल्या छोट्या पण सुंदर कुटीराकडे ते चालत गेले. ते जरी थकलेले दिसत होते तरी खूप प्रसन्न वाटत होते. जेव्हा कुणीतरी या जागेचे कौतुक केले तेव्हा पुढे अजून खूप काम करावयाचे बाकी आहे हे निदर्शनास आणून देताना ते म्हणाले, "आपण सध्या जे पहात आहोत ते अजून" रामाला पाळण्यात पहात आहोत". बऱ्याच वर्षांपासून हैदराबाद येथे वास्तव्य करणाऱ्या त्यांच्या महाविद्यालयीन मित्राबरोबर , श्री डी.एस. राव यांच्यासोबत त्यांनी दुपारचे भोजन घेतले. पू. गुरुदेव आणि श्री. राव यांना बनारस हिंदू विश्वविद्यालयातील आठवणींना उजाळा देताना पाहून खूप बरे वाटले. संध्याकाळी ते रात्रीच्या वास्तव्यासाठी एका स्थानिक अभ्यासीच्या घरी गेले.

शनिवारी सकाळी गुरुदेव जरा लवकरच उठले व झोपाळ्यावर येऊन बसले. त्यांनी लवकर आलेल्या अभ्यासींना तो एक सुखद धक्काच दिला. नंतर, पू. गुरुदेव ध्यानकक्षाकडे चालले असता एक युवती येऊन त्यांना म्हणाली, शुभदिन गुरुदेव! यावर त्यांनी तिच्याकडे पाहून म्हटले,"मी तुम्हा सर्वांचा दिन शुभ व्हावा म्हणूनच येथे आलो आहे." सत्संगानंतर ९ वाजता अभ्यासींच्या शुभेच्छांना प्रतिसाद देताना गुरुदेवांनी अभ्यासींच्या आध्यात्मिक आरोग्याची विचारपूस केली. अभ्यासींचे आध्यात्मिक आरोग्य चांगले असले पाहिजे आणि ते टिकून राहण्यासाठी त्यांनी योग्य काळजी घ्यावयास हवी असेही ते म्हणाले.

रविवारी सकाळी उपस्थित सुमारे ५५०० अभ्यासींसाठी पू. गुरुदेवांनी सत्संगाचे संचालन केले. नुकत्याच आजारातून उठलेल्या एका वयस्कर अभ्यासीची विचारपूस करण्यासाठी ते सत्संगानंतर थांबले. त्यांची ही काळजी आणि प्रेम हे खरोखरच खूप हृदयस्पर्शी होते. पू. गुरुदेवांनी यावेळी सांगितले की जसजसे आपले वय वाढते तसतशी आपली वैयक्तिक शिस्तही वाढायला हवी.

## नवीन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा



२०१० हे वर्ष संपत असतांनांच अभ्यासी मणपक्कम आश्रमामध्ये पू. गुरुदेवांच्या सहवासात रहाण्यासाठी येऊ लागले होते. गेल्यावर्षीचा आढावा घेऊन, अगणित संधी सामावलेल्या व 'ते' आपल्याला ज्याप्रकारे घडवू इच्छितात त्या बदलासाठी स्वत:स तयार करण्याची संधी देणाऱ्या नवीन वर्षाला सामोरे जाण्यासाठी सज्ज होण्याची ही वेळ होती. संपूर्ण आश्रम रोषणाईने ऊजळून गेला होता व अभ्यासी एकमेकांना भेटून नववर्षाच्या शुभेच्छा देत होते.

पू. गुरुदेव लवकर उठून तयार होते व त्यांना शुभेच्छा देण्यास येणाऱ्या अभ्यासींना भेटत होते. दि. १ जानेवारी २०११ रोजी सकाळच्या सत्संगासाठी सुमारे ७००० अभ्यासी उपस्थित होते. यावेळी बंधू कृष्णा यांचे छोटेखानी भाषण झाले व त्यानंतर पू. गुरुदेवांनी बंधू कुमारेश व भगिनी जयंती या वादकांचा सादर सत्कार केला.

## दिवाळीचा उत्सव

पू. गुरुदेव हे मणपक्कम येथेच होते व सुमारे १००० अभ्यासी त्यांच्यासोबत रहाण्यासाठी आले होते. दि. ५ नोव्हेंबर रोजी दिवाळी होती व आश्रमामध्ये अभूतपूर्व उत्साह व आनंदात ती साजरी करण्यात आली. सकाळी पू. गुरुदेवांनी सत्संगाचे संचालन केले व सर्वांची हृदये प्रेमाने ऊजळून टाकली. गुरुदेवांचे कुटीर अतिशय सुंदररित्या रांगोळी व दिव्यांनी सजविले होते.

दि. १० नोव्हेंबर रोजी पू. गुरुदेवांनी मणपक्कम आश्रमामध्ये १५ लग्ने लावली. यावेळी त्यांनी या अध्यात्मिक लग्नाद्वारे एकत्र आलेल्या नवदांपत्यांना एकमेकांचा हात न सोडण्याचा सल्ला दिला.









बऱ्याच माता आणि होणाऱ्या माता पू. गुरुदेवांचा आशीर्वाद घेण्यासाठी रांगेत उभ्या होत्या. त्यापैकी एकीला पू. गुरुदेव म्हणाले की, सशक्त अश्या सहजमार्गी बालकाला जन्म द्या आणि या जगात आणल्यानंतर त्या बालकावर आपला हक्क सांगू नका. ते सहजमार्गाचे बालक असेल.

लहान मुले बराच वेळ शांतपणे आणि शिस्तबद्धपणे पू. गुरुदेवांना बालदिनाच्या शुभेच्छा देण्यासाठी वाट पहात होती. त्यांनाही पू. गुरुदेव जाऊन भेटले. त्यांना गुरुदेव म्हणाले,"तुम्ही लक्षात ठेवा की तुम्ही सहजमार्गाची मुले आहात. सर्वांवर प्रेम करा. प्रेमाने मोठे व्हा. थोरामोठ्यांचे आणि आईवडिलांचे आज्ञापालन करा. तुम्हा सर्वांना बाबुजी महाराजांचे आशीर्वाद आहेत.

सोमवार, दि. १५ नोव्हेंबर रोजी पू. गुरुदेवांनी एका अभ्यासीच्या कंपनीच्या नवीन जागेत सत्संगाचे संचलन केले. त्यानंतर त्यांनी दोमालगुंडा आश्रमाकडे प्रस्थान केले. आश्रमात प्रवेश करताच, मे १९६७ च्या सुमारास या आश्रमाच्या उदघाटनाच्यावेळी काढलेल्या, बाबुजी महाराजांच्या छायाचित्रापाशी येऊन ते थांबले. त्यानंतर त्यांनी ५०० हून अधिक अभ्यासींसाठी सत्संगाचे संचालन केले.

दोमालगुंडा शहराच्या उत्तरेस विभागीय आश्रम आणि दक्षिणेस 'कान्हा' प्रकल्प आहे. त्यामुळे भविष्यातील भेटींसाठी हा आश्रम पू. गुरुदेवांसाठी एक चांगले विश्रांतीस्थान होऊ शकेल. पू. गुरुदेवांनी विभागीय आश्रमाचा उत्तर कैलास, कान्हाचा दक्षिण कैलास तर दोमालगुंडाचा मध्य कैलास असा उल्लेख केला.

त्यांनी कान्हा प्रकल्पावर कार्यरत असणाऱ्या चमूची भेट घेतली व कामाची पाहणी केली. त्यांना दाखविलेली पहिलीच योजना त्यांच्या विचारांशी मिळतीजुळती असल्याचे पाहून ते आनंदित झाले. ते म्हणाले की पहा उच्चत्तम हेतूला साध्य करण्यासाठी निसर्ग कसा मदत करत आहे. त्यानंतर त्यांनी तुमकुंठा आश्रमाकडे प्रयाण केले व ते तेथे सायंकाळी ४ वाजता पोहोचले.

दि. १६ तारखेस दुपारी आभाळ भरून आले होते आणि पावसाचा थोडा शिडकावाही झाला होता. पू. गुरुदेव झोपाळ्यावर बसून उपहारगृहात बनत असलेल्या पदार्थांविषयी चौकशी करित होते. कुणीतरी गरम नाश्ता आणून दिल्यावर गुरुदेवांनी तो चाखला आणि बाकीचा रिमझिम पावसात उभ्या असणाऱ्या अभ्यासींमध्ये वाटावयास सांगितले.

भारतीय वायूसेनेत कार्यरत असणारा अभ्यासींचा एक चमू पू. गुरुदेवांना भेटण्यास आला होता. त्यांना पाहून पू. गुरुदेव खूप खूश झाले व हसत हसत ते म्हणाले, "ज्यांना आकाशात उड्डाण करायची सवय आहे ते खाली बसू शकतील काय? त्यांना गुरुदेवांनी कुटीरामध्ये सिटिंग दिली.

दि. १७ नोव्हेंबर रोजी बकरी-ईदची सुट्टी असल्याने अभ्यासींची गर्दी वाढली होती. पू. गुरुदेवांनी सकाळी ९ वाजता सत्संगाचे संचालन केले आणि त्यानंतर त्यांच्याहस्ते हैदराबादच्या एका जोडप्याचा वाङनिश्चय संपन्न झाला. आपल्या साधनेत"एखादी गोष्ट सोडून देऊन पुढे जाण्याची वृत्ती बाळगण्याविषयी बंधू चक्रपाणि यांनी सुंदर वक्तव्य केले. त्यांनी विश्वस्तपणाची वृत्ती अंगिकारण्याची गरज असल्याचेही सांगितले.

संध्याकाळच्या सत्संगानंतर भगिनी सौम्या आणि बालकेंद्रातील पाच छोव्यांनी नृत्य सादर केले. पू. गुरुदेवांनी कुटीरातूनच त्याचा आस्वाद घेतला.

दि. १८ रोजी गुरुदेव सगळ्यांना भेटण्यात, सिटिंग देण्यात आणि संगणकावर काम करण्यात व्यस्त होते. त्यांना डोकेदुखीचा त्रास होत असूनही ते केवळ त्यांच्या इच्छाशक्तीच्या जोरावर एवढे काम करीत असल्याचे सर्वांना जाणवत होते. दुपारी २:३० वाजता त्यांनी चेन्नईकडे प्रयाण केले.

## आशिया सत्र

चीन, हाँगकाँग, इंडोनेशिया, जपान, कोरिया, मकाऊ, नेपाळ, फ़िलिपाइन्स, श्रीलंका, तैवान, थायलंड आणि व्हिएतनाम या देशातील सुमारे २५० सहभागी असलेले आशियाई सत्र दि. २९ नोव्हेंबर ते ३ डिसेंबर दरम्यान आयोजित करण्यात आले होते. यामध्ये बंधू पी.आर. कृष्णा, बंधू चक्रपाणी, भगिनी श्रीमती राठोड व बंधू एन प्रकाश यांची भाषणे झाली. दि. २८ नोव्हेंबर रोजी सत्संगानंतर गुरुदेवांनी आशियामधिल (भारता बाहेरील) मलेशिया येथील पहिल्या आश्रमाची घोषणा केली.

गुरुदेव त्यांच्या उदघाटनपर भाषणात चरित्रनिर्माणाविषयी बोलले. ते म्हणाले, " बाबूजी म्हणत, मी तुमच्यात, खूप उन्नत, खूप भव्य, तेजस्वी, दैदीप्यमान, मधुर, समरुप, प्रेमाने भरलेले असा काहीही बदल घडवू शकतो. बाहेरील जगाशी व्यवहार ही तुमची समस्या आहे. तुम्हाला इच्छाशक्ती मिळालेली आहे, तुम्हाला बुध्दीमत्ता मिळालेली आहे, जी फ़क्त मानवाकडेच आहे. 'ते' जे काही सांगतात फ़क्त तेच ऐका, फ़क्त 'त्यांनाच' पहा, 'ते' जे तुम्हास करण्यास सांगतील तेच करा. त्यांना कधीच दृष्टीआड करु नका. त्यांचे अनुकरण करा. जसे मातेच्या कडेवरील बाळ ती जेथे जाईल तेथे पोहोचते, त्याप्रमाणे तुमच्या नकळत तुम्ही तेथे पोहोचाल.







गुरुदेवांनी अभ्यासींसोबत अनौपचारिक वेळ व्यतीत केला. पहिल्या दिवशी नवीन अभ्यासींना त्यांनी भेटण्याचे आमंत्रण दिले. चीनी अभ्यासींच्या मनात खूप प्रश्न होते. त्यासर्वांची उत्तरे गुरुदेवांनी शांतपणे दिली. तेथे एक दुभाषीसुद्धा होता. काही वेळा दुभाषाचे भाषांतर पूर्ण होण्याआधीच गुरुदेव उत्तर देत असत. आश्चर्याची बाब म्हणजे जे अभ्यासी फ़क्त चीनी भाषाच जाणत होते ते सुद्धा गुरुदेवांचे बोलणे समजल्यापर मान हलवत होते.

चीन मधील लोक सहजमार्गाबाबत काहीच जाणत नसल्यामुळे चीनमधे साधना कशी करावी याबाबत एका अभ्यासीने गुरूदेवांकडे विचारणा केली. गुरुदेव म्हणाले कि लोकांना आकर्षित करण्याकरिता आपण आदर्श ठरले पाहिजे, आणि ही काही खरोखर काळजी करण्याची बाब नाही किंवा त्याबाबत घाबरण्याचे कारण नाही.

ते वेगवेगळ्या देशातील ५८ प्रशिक्षकांना भेटले आणि त्यांनी प्रशिक्षकांच्या कामाबाबतच्या खूप सोप्या पण समर्पक प्रश्नांना उत्तरे दिली. त्यांनी त्यांच्या कार्यालयात प्रसारीत केलेला एक सांस्कृतिक कार्यक्रम देखील पाहिला.

बाबूजी महाराजांच्या मलेशिया व सिंगापुर येथील तसेच गुरुदेवांच्या मलेशिया, जपान व चीन या देशांच्या भेटीबाबतची २० मिनीटांची एक चित्रफ़ीत दाखवण्यात आली. गुरुदेवांची ईच्छा होती कि प्रत्येक विभागाने अशी चित्रफ़ीत सादर करावी.

गुरुदेवांनी दि.३ डिसें. रोजी सत्संगाचे संचालन केले व त्यानंतर निरोपाचे भाषण केले. तेथे फ्रेंच–चीन आदानप्रदान कार्यक्रमातून शिकण्यासारख्या अनेक संधी होत्या व प्रत्येक केंद्राने प्रत्येक वर्षी काय केले याबाबत सादरीकरण केले. खूप नवीन कल्पना व प्रेमाने ओतप्रोत भरलेल्या ह्रदयाने प्रत्येक सहभागीस या सत्रामुळे नवा जोम आला. तसेच त्यांच्या देशामधे मिशनसाठी अधिक काही करण्यासाठी ते ह्रदयापासून वचनबध्द झाले.

## पूराचा धोका

मोठया प्रमाणात झालेल्या पावसामुळे सखल भागातील मणपक्क्म, मुंगलीवकम व गोवरीनगर येथे पूराचा धोका निर्माण झाला. आश्रमाच्या सभोवती राहणाऱ्या काही अभ्यासींच्या घरात पाणी शिरले. गुरुदेवांनी सर्वांना मणपक्क्म आश्रम सोडून जाण्याचा व बाहेरील अभ्यासींना मणपक्क्म आश्रमास भेट देण्याचा कार्यक्रम रद्द करण्याचा सल्ला दिला. पाऊस थांबेपर्यत व पुराचा धोका संपेपर्यंत आश्रम बंद होते. गुरुदेवांचे प्रेम व काळजी या संपूर्ण संकटकाळात दिसून आली.










## युरोपीयन परिसंवाद दि. १८ डिसेंबर ते २३ डिसेंबर २०१०

युरोपमधील बहुतांश विमानतळ हिमवादळाने बंद असूनही सुमारे १२०० अभ्यासी मणपक्क्म आश्रमात पोहोचू शकले.

गुरुदेवांनी या परिसंवादास गती देण्यासाठी सहभागींना स्वत:स सामोरे जाण्याचे धारिष्ट व मानवतेच्या भवितव्यातील बदल प्रतिबिंबीत करण्यासाठी काय करावे याचा शोध घेण्याचा सल्ला दिला. या सत्राने तुम्हाला खरा गंभीर वेळ दिला पाहिजे, इतरांबरोबर वायफळ चर्चेत वेळ घालवू नये. तुम्ही तो स्वत:जवळ बसण्यासाठी, आत्मपरिक्षण करण्यासाठी, खरोखर मनापासून, खऱ्या सखोलतेने, संपूर्ण सज्ज व तुमच्या ह्रदयाने दिलेले उत्तर मान्य करण्यास उत्सुक असा व्यतीत करावा.

गुरुदेवांच्या सल्ल्यास प्रतिसाद म्हणून सदर कार्यक्रमात त्वरित बदल करण्यात आला. कितीतरी शांत प्रतिबिंबीत क्षण या सत्राचा महत्वाचा भाग म्हणून विचारार्थ मांडले गेले. या शांत प्रतिबिंबीत क्षणांव्यतीरिक्त आणि दररोजच्या ३ सत्संगाव्यतीरिक्त गुरुदेवांनी त्यांनी निवडलेल्या विषयावर बोलण्यासाठी खालील निवडक वक्ते निवडले. बंधू बी.चक्रपाणी,–'जीवनाचा समुद्र', बंधू पी. आर कृष्णा–'गुरुदेव व मी', बंधू के. एस. बालसुब्रमण्यम–'गुरु आणि शिष्य' व कमलेश पटेल–'खरी साधना'.

जरी ते प्रत्यक्षात सत्रात उपस्थित नव्हते तरी त्यांनी सर्व भाषणे पाहिली जी त्यांच्या कार्यालयात प्रसारित करण्यात आली. या संपूर्ण सत्रादरम्यान झालेल्या औपचारिक बैठकात व त्यांच्या निवासस्थानी झालेल्या अनौपचारिक संमेलनात गुरुदेवांनी त्यांचा आनंद व्यक्त केला. त्यांनी त्यांच्या अतुलनीय पद्धतीत विविध प्रकारच्या गंभीर विषयांवर भाषण केले. गृहस्थजीवन आणि शारीरिक संबंध या नेहमीच निषीद्ध मानल्या जाणाऱ्या बाबींना आव्हान देण्याचे धाडस केले.

युरोपमधील सध्या अस्तित्वात असलेल्या बर्लिन आश्रमाच्या जागेवर त्यांनी युरोपमधील पहिल्या 'क्रेस्ट'च्या (CREST) निर्मितीची घोषणा केली व पहिले सत्र तरूण अभ्यासींसाठी "मनुष्यप्राणी हा काय आहे किंवा कोण आहे?" या विषयावर २०११ च्या वसंतऋतुत आयोजित करण्याचे सुचविले. तसेच त्यांनी युरोपमधील सध्या अस्तित्वात असलेल्या व्राद्स सांडे आश्रम, डेन्मार्क येथील जागेवर पहिल्या रिट्रीट केंद्राच्या निर्मितीची सुद्धा घोषणा केली. त्यांच्या समारोपपर भाषणात त्यांनी सहभागींना स्वत:मध्ये जीवनाच्या "आनंदाची निर्मिती" करण्यास आमंत्रित केले आणि सहभागी ह्या स्थितीत तसेच आता युरोप हा भारताचाच भाग असल्याची भावना मनात ठेवून घरी परतले.

# नवीन प्रकाशने




समग्र संदेश (पृष्ठ बांधणी)




समग्र संदेश




हृदयीचे बोल २००५ – तामिळ




हृदयीचे बोल २००६ – तेलुगु




'अवेकन अवर कॉन्शसनेस' – डि.व्ही.डी. इंग्लिश




'ए सेलीब्रेशन– द हार्ट्स एक्सप्रेशन ऑफ ईट्स ग्रेटिट्युड'




अवेकन टु ट्रुथ – डि.व्ही.डी. इंग्लिश

या सर्व डि.व्ही.डी.मध्ये इंग्लिश, फ्रेंच, स्पॅनिश, जर्मन, इटालियन, रशियन, तामिळ, तेलुगु, हिन्दी, कन्नड या भाषांमध्ये सब–टायटल्स उपलब्ध आहेत.

# निवेदन

## क्रेस्ट – बर्लिन, जर्मनी

पू. गुरुदेवांनी, युरोपमध्ये बर्लिन, जर्मनी येथे असलेल्या सहजमार्ग अध्यात्मिक प्रशिक्षण संस्थेच्या जागेस 'क्रेस्ट' म्हणून मान्यता दिली आहे. या क्रेस्टचे संचालक म्हणून त्यांनी बंधू क्रिस्टीन मॅकेन्झ यांची नियुक्ती केली आहे.

## सतखोल अर्ज – वसंत २०११

वसंत – जानेवारी ते मार्च २०११ साठीच्या सतखोलभेटीचे अर्ज आता http://www.sahajmarg.org/smww/satkhol/application-guidelines या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. प्रवेश अर्ज भरण्याअगोदर कृपया मार्गदर्शक सूचना काळजीपूर्वक वाचाव्यात.

ज्यांच्याकडे इंटरनेटची उपलब्धता नसेल त्यांनी आपले प्रशिक्षक, केंद्रप्रमुख किंवा विभागप्रमुखांची मदत घ्यावी.

आपल्या काही शंका असल्यास सतखोल कार्यालयाशी ०४४–२२५२१०९९ किंवा ०४४–४२१७११११ विस्तारित क्रमांक २१८ येथे संपर्क साधावा.

## भुतकाळाचे पुनरावलोकन



## पू. बाबूजींचा ८५ वा जन्मदिवस समारोह, चेन्नई–१९८४

पू. बाबूजी महाराजांनी महासमाधी घेतल्यानंतर संपन्न झालेला पहिलाच मुख्य समारोह म्हणजे त्यांचा जन्मदिवस समारोह होय ज्यामध्ये भारतातून व विदेशातुन आलेल्या सुमारे ३५०० अभ्यासींनी भाग घेतला होता. चेन्नई येथील 'विजया शीशमहाल', वडापलानी येथे हा समारोह आयोजित करण्यात आला होता. जवळच असलेल्या एका मंगल कार्यालयामध्ये रहाण्याची व्यवस्था करण्यात आली होती व दररोज अभ्यासींना येण्याजाण्यासाठी वाहनांची व्यवस्था करण्यात आली होती. दि. २९ एप्रिल रोजी समारोहाची सुरुवात होऊन दि. १ मे रोजी तो संपन्न झाला. पू. गुरुदेवांनी दररोज सकाळी व संध्याकाळी सत्संगाचे संचालन केले. पू. गुरुदेव समारोहाच्या प्रत्येक गोष्टीमध्ये व्यक्तिगतरित्या सहभागी होते ज्यामध्ये त्यांना त्यांची पत्नी भगिनी सुलोचना यांची समर्थ साथ लाभली होती.

त्यांच्या आशिर्वादाने सर्व वातावरण दिव्यता, आनंद, प्रेम व बंधूत्वाच्या भावनेने भारले गेले होते. पू. गुरुदेवांचे वडील श्री. सी.ए.राजगोपालाचारी देखिल यावेळी संपूर्ण काळ उपस्थित होते. या समारोहादरम्यान बाबूजींचे संदेश असणारी एक छोटी पुस्तिका प्रकाशित केली गेली.

यावेळी गुरुदेवांनी 'पुढील कार्य' या नावाने संदेश दिला ज्यामध्ये त्यांनी बाबूजींनी आपल्यासर्वांसाठी पाहिलेल्या स्वप्नाची आठवण करुन दिली व त्यांनी आपल्यासाठी ठरवून दिलेले उद्दीष्ट पूर्ण करण्याच्या आमच्या कार्याची देखिल जाणीव करुन दिली. मिशनच्या इतिहासात मैलाचा दगड ठरलेल्या या संदेशामध्ये त्यांनी हे ऊद्दीष्ट पूर्ण होणारच कारण ही 'त्यांची ईच्छा' आहे हे ठासून सांगितले. बदलाची अपरिहार्यता आपल्या हृदयांमध्ये आशेच्या स्वरुपात प्रतिबिंबीत होते व ते जे आपणांस बनवू ईच्छितात ते बनण्यासाठी आश्वस्त करते. यापूढे येणारी हजारो वर्षे मानवतेची सेवा करण्यासाठी मिळालेला अध्यात्मिक वारसा म्हणूनच एक पवित्र विश्वास आहे जो आपणांस टिकवून ठेवायचा आहे व संपूर्ण जगातील अध्यात्मिकतेच्या शोधात असणाऱ्या पूढील अनेक पिढ्यांना तो त्याच्या मूळ व निखळ स्वरुपात द्यायचा आहे. शेवटी त्यांनी आपणांस स्पष्टपणे पण काळजीपूर्वक विनंती केली "ऊठा! जागे व्हा! तोपर्यंत विश्रांती घेऊ नका जोपर्यंत तुम्हास सोपविलेले दिव्य कार्य त्यांच्या मनाप्रमाणे होत नाही" (हा भाग "ॲन्ड ही मार्चेस ऑन" या २४ जुलै २००७ च्या विशेष स्मरणिकेतून घेतला आहे)

खंड ४ अंक १
श्री राम चंद्र मिशन
एकोज इंडिया वार्तापत्र
जानेवारी २०११

# प्रकाशाची नवीन केंद्रे

## ऊदूमलपेट



एप्रिल १९९० मध्ये ऊदूमलपेट येथे केंद्र सुरु झाले होते. आता तेथे ३ प्रशिक्षक व १५० अभ्यासी आहेत. ऊदूमलपेट येथील आश्रम राजवूर या अतिशय आदर्श व निसर्गरम्य अशा जागी वसला आहे व पू. गुरुदेवांनी याला 'शांती आश्रम' असे नाव दिले आहे. हे आश्रम शहराच्या मुख्य भागापासून सुमारे ६ कि.मी. लांब आहे.

एका वर्षापूर्वी पू. गुरुदेवांच्या कार्यालयाचे उद्घाटन करण्यात आले व त्याचवेळी या जागेची नोंदणी करण्यात आली. आश्रमाच्या परिसरासाठी सुमारे ५ एकर जमीन निश्चित करण्यात आली असून सुमारे ८ एकरांची शेतजमीन अभ्यासींच्या जागेकरिता विभाजित करण्यात आली आहे.

दि. ५ डिसेंबर २०१० रोजी सुमारे ७५ अभ्यासींच्या उपस्थितीत बंधू एन प्रकाश यांनी येथे प्रथम सत्संगाचे संचालन केले. ध्यानगृह सुमारे ६० * ४० फूट एवढे असून तेथे सुमारे ३०० अभ्यासी बसू शकतांत.



## दिंडीगुल

मार्च १९९१ मध्ये या केंद्राची सुरुवात झाली व एका भगिनी अभ्यासीच्या घरी सुरुवातीस सत्संग होत असे. जेव्हा अभ्यासींची संख्या वाढू लागली तेव्हा रवीवार सत्संगाची जागा 'अमलादेवी' दवाखान्यामध्ये स्थानांतरित करण्यात आली.

शहरापासून १५ कि.मी. अंतरावर असणारी वेथापरई येथील आश्रमाची जागा २ वर्षापूर्वी घेण्यात आली. वेथापरई येथे मोठ्याप्रमाणावर मोगऱ्याच्या बागा आहेत तसेच आसपास नारळाच्या बागा आहेत. आश्रम वथलानकुंडू रोडवर असून तमिळनाडू मधील सुंदर असे थंड हवेचे ठिकाण – कोडाईकॅनॉलला जाण्याच्या रस्त्यावर आहे.

नवीन ध्यानगृह बांधले जाईपर्यंत रविवार सत्संग सुमारे २ वर्षे तात्पूरत्या उभारलेल्या तंबूमध्ये होत होता. ध्यानगृहाची आसनक्षमता ३०० अभ्यासींची असून तो ६०*४० फूट रुंद आहे. दि. ५ डिसेंबर २०१० पासून पू. गुरुदेवांनी हे ध्यानगृह वापरण्यास परवानगी दिली असून प्रथम सत्संग बंधू विश्वनाथ राव यांनी ५० अभ्यासींच्या उपस्थितीत केला. दुपारी १ वाजता बंधू एन प्रकाश यांनी आणखीन एका सत्संगाचे संचालन केले. हा महिन्याचा प्रथम रविवार असल्यामुळे प्रथेनुसार संपूर्ण दिवसाचा कार्यक्रम ठेवला होते. अनेक अभ्यासी बंधू भगिनी 'हृदयीचे बोल' या त्यादिवसाच्या विषयावर बोलले व या विषयाशी संबंधित त्यांच्या वैयक्तिक अध्यात्मिक अनुभवांविषयी सांगीतले. ही अत्यंत पवित्र सुरुवात व परिणामकारक पूर्ण दिवसाचा कार्यक्रम होता.

## तिरुवन्नामलाई, तामिळनाडू



चेन्नईपासून सुमारे १८५ कि.मी. अंतरावर तिरुवन्नामलाई हे नवीन प्रकाशकेंद्र उदयास येत आहे. हे केंद्र सुमारे १० वर्षापूर्वी कन्नमंगलम येथील प्रशिक्षक बंधू वेलू यांनी सुरु केले. यानंतर याची प्रगती काहिशी मंदच होती. पू. गुरुदेवांनी ध्यानगृह बांधण्यास परवानगी दिल्यानंतर अतिशय कमी वेळात काम पूर्ण करण्यात आले. दि. १४ नोव्हेंबर रोजी ध्यानगृहाचे ऊद्घाटन करण्यात आले. या समारंभाला विभागीय प्रमुख बंधू एस प्रकाश यांच्यासह आसपासचे अनेक अभ्यासी उपस्थित होते. या ध्यानगृहास टेकड्यांचा मनमोहक असा परिसर निसर्गरम्य व सकारात्मक वातावरणासह लाभला आहे.

यावेळी बंधू शणमुगम, बंधू प्रकाश, बंधू लक्ष्मीनारायण, बंधू तिरुनावुक्करसू यांची भाषणे तर समारोपाचे भाषण बंधू श्रीरामन यांनी केले.

### आश्रम प्रकल्प – गुलबर्गा

गुलबर्गा केंद्राने नवीन आश्रम व निवासी वसाहतीसाठी ३४ एकर जागा खरेदी केली आहे. दि. १६ नोव्हेंबर रोजी पू. गुरुदेवांनी आश्रमाची जागा व निवासी वसाहत असलेला आराखड्याचा नकाशा मंजूर केला. या नवीन आश्रमाचे नाव 'बाबूजी मेमोरिअल आश्रम, गुलबर्गा' असे निश्चित केले आहे तर निवासी वसाहत 'योग जीवन एन्क्लेव्ह' म्हणून ओळखली जाईल. सध्याच्या आश्रमापासून ही जागा सुमारे ७.५ कि.मी दूर आहे.

## आश्रमासाठी जागा, इंदोर



पू. गुरुदेवांच्या कृपाआशीर्वादाने इंदोर केन्द्राला ३० एकरची नवीन जागा आश्रमासाठी मिळाली आहे. ही जागा सध्याच्या आश्रमापासून साधारण १२ कि.मी. अंतरावर आहे. या नवीन आश्रमाच्या जागेवर १४ नोव्हेंबरला एक पूर्ण दिवसाचा कार्यक्रम आयोजित केला होता. सुमारे ६०० बंधु व भगिनी या कार्यक्रमाला उपस्थित होते.

## नवीन केंद्र – परलखेमुंडी, ओरीसा

नोव्हेंबर २०१० मध्ये ओरीसा क्षेत्रामधील गजपति जिल्ह्यात परलखेमुंडी येथे एक नवीन केंद्र सुरु करण्यात आले. परलखेमुंडी पूर्वी एक संस्थानिक होते. हे संस्थानिक परलखेमुंडीच्या भौगोलिक केन्द्राभोवती ५ कि.मी. च्या त्रिज्येमध्ये वसवले गेले आहे.

या केंद्रात दोन तुकड्यांमध्ये १९ अभ्यासींनी साधनेला सुरुवात केली. येथे प्रशिक्षक नसल्याने शेजारच्या केंद्रातील प्रशिक्षक अभ्यासींना सेवा पुरवतील. सध्या बंधू संतोष साहु हे समन्वयक म्हणुन कार्य करत आहेत. (संपर्क क्रमांक – ०९९३७०८०७०७). ओरीसा क्षेत्रामधील हे २० वे केंद्र आहे.

## हसन केंद्राचा १० वा वर्धापन दिवस

दि. ५ डिसेंबर २०१० रोजी मिशनच्या हसन केंद्राचा १० वा वर्धापन दिवस होता आणि तो साजरा करण्यासाठी एक पूर्ण दिवसाचा कार्यक्रम आयोजित केला गेला. चिकमंगळुर, तिपतुर, बेंगलोर व मैसूर येथील अभ्यासींना या कार्यक्रमात भाग घेण्यासाठी आमंत्रित केले होते.

कार्यक्रमाची सुरुवात सकाळच्या ध्यानाने झाली. त्यानंतर अभ्यासींची भाषणे झाली. भाषणांचे विषय होते, "अभ्यासींची भूमिका", "दहा नियम", "सहज मार्ग पद्धती व त्याचे साधेपण", “सहज मार्गाची मूलभूत तत्वे”. दुपारच्या जेवणानंतर प्रश्नोत्तराचे सत्र झाले ज्यामुळे सहभागी अभ्यासींचे साधनेबद्दलच्या शंकांचे निरसन होण्यास मदत झाली. सदगुरु आपल्या अभ्यासींसाठी त्रास सहन करतात व त्याग करतात याबद्दल देखील वक्त्यांनी सांगीतले. कार्यक्रमाची सांगता संध्याकाळच्या सत्संगाने झाली.

## घरगुती मेळावे
## थेनी जिल्हा, तामिळनाडू



दि. २३ आक्टोबर,२०१० रोजी बोदिनैकनुर व कुंबम या भागांमध्ये घरगुती मेळावे आयोजित करण्यात आले. बंधू आर. सुंदरम व भगिनी सुभश्री श्रीनिवासन यांनी आयोजित केलेल्या या घरगुती मेळाव्याला दक्षिण तमिळनाडुचे क्षेत्रप्रभारी बंधू विश्वनाथ राव हे उपस्थित होते. बोदिनैकनुर येथील मेळाव्यामध्ये काही जुने अभ्यासी आले होते जे काही वर्षापासून साधना करत नव्हते. ही एक आश्चर्याची घटना होती. त्यांनी परत नियमितपणे साधना करण्याचा निर्धार केला.

कुंबम येथे मुन्नार डोंगराच्या पायथ्याशी असलेल्या एका अभ्यासीच्या घरी ४० जण एकत्रित झाले. बंधू सुंदरम यांनी जमलेल्या लोकांना मिशनची माहिती दिली.

## हैदराबाद

येथील वेगवेगळ्या उपकेंद्रात महिन्यातून अथवा आठवड्यातुन घरगुती मेळावे आयोजित केले जात आहेत. हे मेळावे अभ्यासींसाठी व ज्यांना या पद्धतीबद्दल उत्सुकता आहे अशा दोघांसाठीही आहे. अभ्यासींना बोलते करण्यासाठी, त्यांच्यामध्ये सहजमार्गाच्या तीन 'एम' (M) बद्दलची माहिति खोलवर रुजवण्यासाठी व आपण सगळे एकाच कुटुंबातील असल्याची भावना वाढवण्याच्या हेतूने हे मेळावे करण्यात येतात.

आध्यात्मिकतेबद्दल उत्सुकता असणाऱ्या शेजारच्या लोकांना व मित्रांना आमंत्रित केले जाते आणि त्यांना सहजमार्गाबद्दल माहिती दिली जाते. हे मेळावे अनौपचारिक व खुल्या चर्चेच्या स्वरुपाचे असतात ज्यामुळे सहभागींना मोकळेपणाने बोलता येते.

हैदराबाद येथील मल्काजगिरी उपकेंद्रात गेल्या काही आठवड्यापासुन साधारण ३० अभ्यासी प्रत्येक शनिवारी एकत्र येतात. या भेटीमध्ये ते साधनेच्या वेगवेगळ्या पैलूंवर चर्चा करतात. असे लक्षात आले की यामुळे प्रत्येक अभ्यासी अधिक मोकळेपणाने बोलू लागला आणि स्वतःला जास्त गुंतवुन व उत्साहाने साधना करु लागला.

## अंगुल, ओरीसा येथील कौटुंबिक स्नेहसंमेलन

९ डिसेंबर २०१० च्या सायंकाळी अंगुल केंद्रामध्ये अभ्यासी कुटुंबांचे स्नेहसंमेलन आयोजित करण्यात आले. या कुटुंबांमध्ये जवळचे नाते निर्माण व्हावे या उद्देषाने हे केले गेले. जरी हे स्नेहसंमेलन अनौपचारिक असले तरी आध्यात्मिक जीवनावर आधारलेले होते. सहभागींनी आध्यात्मिक जीवनामध्ये पुढे जाण्याच्या हेतुने आपल्या विचारांची, अनुभवांची व सूचनांची देवाण–घेवाण केली.

या उपक्रमातुन केंद्र वाढविण्यासाठी उपाय योजना करण्याच्या दृष्टीने महत्वाची सूचना मिळाली. या प्रयत्नामध्ये सर्व अभ्यासींना गुंतवण्याचे मार्ग व पद्धतीबद्दल सूचना मिळाली. केंद्राच्या वाढीसाठी दोन महिन्यातून एकदा तरी अशा संमेलनाच्या माध्यमातून भेटण्याचा निर्धार अभ्यासींनी केला.

## समन्वयकांसाठी परिसंवाद, सूरत



दि. १२ डिसेंबर रोजी सूरत केंद्राने क्षेत्रीय स्तरावर समन्वयकांसाठी एका पूर्ण दिवसाच्या परिसंवादाचे आयोजन केले होते. घरगुती मेळावे, मूल्याधारित शिक्षण, निबंध लेखन, जवळपासच्या केंद्राचा विस्तार आणि अशा विषयांवर विचारविनिमय करुन शंकानिरसन करणे हा या परिसंवादाचा उद्देश्य होता. दक्षिण प्रभागातील बऱ्याच केंद्रामधून सुमारे ८४ समन्वयकांनी यामध्ये भाग घेतला.

क्षेत्र प्रभारी बंधू हिरेन शहा यांनी स्वागतपर भाषण केले. बंधू सुरेश राजगोपालन, बंधू सुरेंद्र अग्रवाल, भगिनी सौम्या राजगोपालन, भगिनी विभा राठोड, आणी बंधू विलास भोंडे हे त्या कार्यक्रमातील वक्ते होते.

## अंधविश्वास आणि अध्यात्मिक विकास यावर चर्चा, जयपूर (आंध्र प्रदेश)

दि. ३१ आक्टोबर २०१० रोजी अभ्यासींमध्ये अंधविश्वास आणि अध्यात्मिक विकास यावर चर्चा केली गेली. बऱ्याच जणांनी हे अंधविश्वास व या समजूतींना कारणीभूत असणाऱ्या घटना वर्णिल्या व त्यावेळच्या विचारांच्या घालमेलींवर गुरुदेवांच्या मार्गदर्शनामुळे कसा विजय मिळविता आला हे सांगितले. काही नवीन अभ्यासींना हे कसे काय शक्य आहे याचे नवल वाटले. जुन्या व जाणकार अभ्यासींनी त्यांना समजावून सांगितले की गाढ विश्वासाने केलेला नियमित अभ्यास नेहमीच आपणाला गुरुदेवापुढे खुले होण्यास मदत करतो. त्यानंतर संस्थेच्या साहित्याबदल, मुख्यत्वेकरुन
"व्हिस्पर्स फ्रॉम ब्राईटर वर्ल्ड" वरती चर्चा झाली. या चर्चेदरम्यान सर्वांनाच गुरुदेवांच्या प्रेमाची व मार्गदर्शनाची जाणीव झाली.

## अध्यात्मिक विरंगुळा, अहमदाबाद

दिवाळीच्या सुट्ट्यांच्या दरम्यान अहमदाबाद केंद्राने सहा दिवसांचा एक अध्यात्मिक विरंगुळ्याचा कार्यक्रम आयोजित केला होता. गुजरातच्या बऱ्याच केंद्रांमधून आलेल्या सुमारे १२५ अभ्यासींनी याचा लाभ घेतला आणि ते योगश्रमामध्ये राहिले. दररोज दोन सत्संगांबरोबरच योगा, ध्वनिचित्रफीत, वैयक्तिक सिटिंग्ज व निशब्द शांतता यासारखे कार्यक्रम नियमित वेळपत्रकानुरुप आखले गेले होते. सहभागींनी स्वयंसेवेमध्येही सक्रीय भाग घेतला. बंधू सुरेश राजगोपालन यांनी एका चर्चात्मक सत्राद्वारे साधनेसंबंधी शंकांचे समाधान केले व त्यानंतर प्रश्नोत्तराचा कार्यक्रम झाला. बंधू धर्मेश व भगिनी कस्तुरी यांनी मुल्याधारित शिक्षणावर एक सत्र घेतले. या कार्यक्रमादरम्यान काही नवीन लोकांनीही साधनेला सुरुवात केली.

## प्रकाशन विभागासाठी कार्यशाळा, दक्षिण कर्नाटक



प्रकाशनाची पोहोच सर्व अभ्यासींपर्यंत परिणामकारकरित्या व कार्यक्षमतेने व्हावी यासाठीचे प्रशिक्षण देण्यासाठी दि १८ व १९ डिसेंबर रोजी मैसूर आश्रमाने दक्षिण कर्नाटकाच्या केंद्रांसाठी एक निवासी प्रकाशन कार्यशाळा आयोजित केली होती. १५ केंद्रांधून सुमारे ५४ अभ्यासींनी यामध्ये सहभाग घेतला. विक्री, लेखाजोखा, साठा तपासणी, नोंदणीकरण व प्रकाशनाचे वितरण यासारख्या कामंची माहिती सहभागींना व्हावी हे या कार्यशाळेचे उद्दिष्य होते. प्रकाशान विभागाचे कामकाज व्यवस्थित चालू असण्यासाठी अभ्यासींना मदत व प्रोत्साहन मिळावे यासाठी एका मागोवा कार्यक्रमाचीही आखणी केली गेली.

## बडोदा, गुजरात

दि २४ आक्टोबर रोजी बडोदा केंद्रामध्ये एका खुल्या मंचाचे आयोजन



केले गेले. सुमारे १५०० निमंत्रण पत्रे अभ्यासी स्वयंसेवकांकडून ओ.एन.जी.सी. कॉलनी व आजूबाजूच्या परिसरामध्ये वाटली गेली. कार्यक्रमाची सुरुवात ओ.एन.जी.सी. च्या नाट्यगृहात रवीवार सकाळच्या ७:३० च्या सत्संगाने झाली. निमंत्रित पाहुण्यांची सकाळी १०:०० वाजता यायला सुरुवात झाली. पहिले सत्र 'अध्यात्माची गरज' यावर झाले ज्यामध्ये संतुलित जीवनाची गरज यावर भर दिला गेला. बंधू कमलेश पटेल यांनी सहजमार्गाची ओळख करुन दिली. त्यांनी सर्वांनाच या अध्यात्मिक यात्रेत सामील होण्यासाठी निमंत्रित केले. श्रोत्यांनी वक्त्यांची भाषणे लक्षपूर्वक ऐकून घेतली. चहापानावेळी प्रशिक्षकांनी साधनेला सुरुवात करु इच्छिणाऱ्या पाहुण्यांनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे दिली. प्रशिक्षकांच्या संपर्कयादी समवेत आपल्या आश्रमाचे नकाशेही सर्वांना देण्यात आले. १७० उपस्थित पाहुण्यांपैकी ८० लोकांनी साधनेची सुरुवात करण्यामधे रुची दर्शविली व बऱ्याच जणांनी सिटींगही घेतली.

केवळ खाजगी वितरणाकरिता

खंड ४ अंक १

श्री राम चंद्र मिशन
एकोज इंडिया वार्तापत्र

जानेवारी २०११

# पूर्ण दिवसाचे कार्यक्रम

## चिन्नवल्लिकुलम आश्रम, विरुधुनगर, तामिळनाडु

विरुधुनगरच्या चिन्नवल्लिकुलम आश्रम येथे दि. ३१ आक्टोबर २०१० रोजी एक पूर्ण दिवसाचा कार्यक्रम आयोजित केला गेला ज्यामध्ये विरुधुनगर, कोविलिपट्टी व करिआपट्टी केंद्राचे सुमारे ४४ अभ्यासी हजर होते. "चरित्र निर्माण" व "नैतिकता आणि नीतिमूल्ये" या विषयावरील गुरुदेवांची भाषणे ऐकविली गेली. अभ्यासींनी उत्साहाने चर्चा व प्रश्नोत्तरांमध्ये भाग घेतला.

## मदुराई आश्रम, तामिळनाडू



दि. ३१ आक्टोबर रोजी झालेल्या या कार्यक्रमात मदुराई आणि जवळपासच्या केंद्रांमधून सुमारे ५०० अभ्यासी सहभागी झाले. बंधू पलनिअप्पन यांनी स्वागतपर भाषण दिले व सर्व अभ्यासींना गुरुदेवांची भाषणे ऐकून त्यांना अंतस्थ करण्याची व तेथील अध्यात्मिक वातावरणाचा लाभ घेण्याची विनंती केली.

भगिनी शांताकुमारी यांनी "सहजमार्गाची मूलभूत तत्वे", भागिनी पलनिअम्मल यांनी "साधना", भगिनी ए जे थंगम् यांनी "दहा नियम व जीवनामध्ये त्यांची भूमिका" व भागिनी लता शिवरामन यांनी "अध्यात्मिक बदल" या विषयांवर भाषणे दिली. गुरुदेवांनी दि. ९ आक्टोबर रोजी मनपाक्कम येथे दिलेल्या "परम चरित्र" या भाषणाचा खुलासा बंधू पी. पलनिअप्पन यांनी करुन दिला. कार्यक्रमाची सांगता सत्संगाने झाली.

दि १४ नोव्हेंबर रोजी क्षेत्रप्रभारी बंधू टी.व्ही. विश्वनाथराव यांनी अभ्यासकक्षाच्या उद्घाटनासाठी मदुराई आश्रमाला भेट दिली. ५०० हून अधिक अभ्यासी हजर असलेल्या रविवारच्या सत्संगानंतर त्यांनी गुरुदेवांच्या प्राणाहुतीमुळे परिवर्तित झालेल्या एखाद्या अध्यात्मिक मानवाच्या वर्तणुकीवर भर देत "चारित्र्य निर्माण" यावर भाष्य केले. संस्थेच्या जागतिक मुख्यालयाकडून मिळालेल्या जी. आय. शीट्च्या पत्र्याने या अभ्यासकक्षाचे छत्र उभारले आहे. बालदिनादिवशीच्या या समारंभासाठी मुलांचे कार्यक्रम आयोजित केले गेले. सुमारे ७० मुले व पालकांनी यामध्ये आनंद व जबाबदारीने भाग घेतला.

## हरदोई, उत्तर प्रदेश

दि ५ डिसेंबर २०१० रोजी एका चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. बंधू संजय यांनी समन्वयन केलेल्या या चर्चेमध्ये बऱ्याच लोकांनी सहभाग घेतला. या सहभागींना गटांमध्ये विभागले गेले. विषय होता "अभ्यासीची अध्यात्मिक उन्नती". सर्वांनी काळजीपूर्वक रित्या चर्चेदरम्यान आलेल्या सर्व मुद्यांना नमूद करून घेतले. प्रत्येक गटाने काही मिनिटाच्या आपल्या वक्तव्यात आपल्या चर्चेचा सारांश सांगितला. गुरुदेवांसाठी कृतज्ञता व आपसांतला बंधुभावाची जाणीव करुन देणाऱ्या या [redacted]दयस्पर्शी कार्यक्रमाला उपस्थित राहिल्याबद्दल बंधू संजय यांनी सर्वांचे आभार मानले.

## रामनाथपुरम

दि २१ नोव्हेंबर रोजी रामनाथपुरम येथे एक कार्यक्रम आयोजित करण्यात आला. रामनाथपुरम, परमकुडी, मनमदुराई व शिवगंगाई च्या प्रशिक्षकांसमवेत सुमारे ४० अभ्यासी यात सहभागी झाले. "सहजमार्गाचा अभ्यासी या नात्याने मला कशाचा अभिमान वाटायला हवा" या मुद्द्यावरील चर्चेपाठोपाठ गुरुदेवांची "अध्यात्माचे महत्व" यावरील एक ध्वनीचित्रफीत दाखविण्यात आली.

## शिवगंगाई

दि २८ नोव्हेंबरला या केंद्राने एक कार्यक्रम आयोजित केला होता ज्यामध्ये शिवगंगाई, मनमदुराई, परमकुडी, रामनाथपुरम व मदुराई या केंद्रांमधुन सुमारे ९० अभ्यासी सहभागी झाले होते. 'जर तुम्हाला सहजमार्ग व्यवस्थित समजला नसेल तर तुम्ही सहजमार्ग साधना व्यवस्थित करु शकणार नाही' या गुरुदेवांच्या उक्तीच्या अनुशंगाने "ध्यान म्हणजे काय?", "ध्यानाचे महत्व", "सहजमार्ग ध्यान पद्धती" व "ध्यानाचे फायदे" या विषयांवर चर्चा झाली.



शिवगंगाई



विरुधुनगर



हरदोई

श्री राम चंद्र मिशन
एकोज इंडिया वार्तापत्र







## तिरूपूर येथील पूर्णदिवसाचा कार्यक्रम

दि. १२ डिसेंबर रोजी डि. जे. पार्क तिरूपूर येथे संपूर्ण दिवसाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

रविवारच्या सत्संगानंतर बंधू  टी. वी. विश्वनाथराव यांनी प्रास्तविक भाषण दिले. यात त्यांनी गुरुदेवांनी आशियाई सेमिनार मध्ये दिलेल्या 'करा किंवा मरा' या भाषणाचा उल्लेख केला.

चारित्र्यनिर्माण हा या कार्यक्रमाचा विषय होता. बंधू आर सुंदरम यांनी या विषयाचे प्रास्तविक केले. चारित्र्य निर्माणाच्या बऱ्याच ठळक वैशिष्ट्यांवर आणि मूळ संकल्पनेवर वक्त्यांनी भाषणे दिली.

या कार्यक्रमात सहभागी झालेल्यांनी या कार्यक्रमाचा खूप लाभ झाल्याचे सांगितले.

## बन्सवाडा, निज़ामाबाद येथील विद्यार्थ्यांसमोर दिलेले व्याख्यान

दि. ११ डिसेंबर रोजी 'श्री कृष्णवेणी टॅलेंट' स्कूल, बन्सवाडा, निज़ामाबाद येथील विद्यार्थ्यांसाठी "मूल्ये आणि आध्यात्मिकता' या विषयावर भाषणाचे आयोजन करण्यात आले होते. साध्या सोप्या खेळांमधून मुलांना सांघिक भावनेचा संदेश पोहोचविला गेला. सुमारे १६ शिक्षक आणि इयत्ता १ली ते ९वीच्या वर्गांमधून सुमारे ४०० विद्यार्थी या कार्यक्रमात सहभागी झाले होते.

बन्सवाडा येथील 'साई कीर्ति' कनिष्ठ महाविद्यालयाने देखील त्यांच्या विद्यार्थ्यांसाठी अशा प्रकारच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यासाठी आमंत्रित केले होते. या सत्रांमध्ये १००हून अधिक विद्यार्थी आणि २०हून अधिक शिक्षक सहभागी झाले होते. साध्या सोप्या प्रयोगांमधून जीवनात संतुलनाची आवश्यकता, मानवी मूल्ये आणि आध्यात्मिकता या गोष्टी विद्यार्थ्यांना स्पष्ट करून सांगण्यात आल्या.

## सहजमार्गाचे सैनिक , दक्षिण कर्नाटक

नतरामपल्ली, तमिळनाडू येथे दि. १३ आणि १४ नोव्हेंबर रोजी द. कर्नाटकातील ४७ अभ्यासींसाठी 'सहजमार्गाचे सैनिक'  या २ दिवसांच्या निवासी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

पूज्य. गुरुदेवांनी एप्रिल २००४ मध्ये दिलेल्या सहजमार्गाचे सैनिक या भाषणावरून प्रेरणा घेऊन या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. गुरुदेवांनी यात असे म्हटले आहे की, "कृपया आता तयार राहा. आता सगळे कठीण होणार आहे, पण आपल्याला अध्यात्माचे सैनिक हवे आहेत...... आपण केवळ आपले संस्कार, आपल्या वाईट सवयी, आपले नकारात्मक विचार नष्ट करतो आणि म्हणूनच आपण अंतरंगातून ईश्वरीय मानव म्हणून पुढे येतो."

दक्षिण कर्नाटकात सहजमार्गाच्या सैनिकांच्या रूपात कार्यरत होणे आणि सशक्त स्वयंसेवकांचा चमू तयार करण्याचा उत्साह निर्माण करणे हाच या कर्यक्रमाचा मुख्य हेतू होता.

सहजमार्ग पद्धतीनुसार जीवन जगणे, स्वत: (सहजमार्गाचे) उदाहरण बनणे, कार्यक्षम आणि परिणामकारक स्वयंसेवक बनणे, अभ्यासींचे व्यक्तिमत्व आणि सहजमार्ग साधनेचा अचूक आणि परिणामकारक मार्ग अशा ५ विषयांवर आधारित सत्रांचा या कार्यक्रमात समावेश होता.

ज्या अभ्यासींना आदर्श गुणांची यादी करावयास सांगितली त्यांनी सांगितले की, सहजमार्ग पद्धती जरी साधी(सरळ) असली तरी उत्कृष्ट आणि परिपूर्ण मानव बनणे हे  खूप अवघड काम आहे. आणि त्यासाठी अभ्यासींनी स्वत:ला वाहून घेण्याची गरज आहे. या कार्यक्रमामुळे अभ्यासींना साधनेबाबतचा दृष्टिकोण बदलून नियमितपणे साधना करण्याची प्रेरणा मिळाली.

## अभ्यासींसाठी कार्यशाळा – मेंगलोर

मेंगलोर  येथे तेथील ३२ अभ्यासींसाठी बंधू  मोहनदास यांनी एका कार्यशाळेचे आयोजन केले होते.

माझे गुरुदेव, माझी पद्धती आणि माझे मिशन या विषयांवर चर्चा करण्यात आली. जीवनात गुरूचे महत्त्व ही डी.व्हि.डी. दाखविण्यात अली. माझी साधनापद्धती या विषयाबरोबरच सहजमार्गाचे गुरू आणि त्यांचे मानवी जीवनातील आध्यात्मिक विकासातील योगदान यावरही सादरीकरण केले. साधनेच्या मुख्य अंगांचे स्पष्टीकरण केले. स्वयंसेवी कामावर त्यांनी खास भर दिला. गुरुदेव आणि शिष्य ही डी.व्ही.डी. ही दाखविण्यात आली. त्यानंतर विविध विषयांवर गटचर्चा करण्यात आली.

बंधू  मोहनदास यांनी चारित्र्य घडविण्यावर खास भर दिला व सांगितले की, आपले बाह्य परिवर्तन बदलणे ही केवळ अभ्यासीचीच जबाबदारी आहे.

कार्यक्रमाच्या समारोपाच्या भाषणात बंधू  के. राधाकृष्ण म्हणाले की, तीन 'एम.' चांगल्याप्रकारे समजण्यासाठी आणि गुरुदेवांच्या अपेक्षेप्रमाणे मानवी जीवनाचे ध्येय लवकरात लवकर गाठण्यासाठी, नेटाने प्रयत्न करण्यासाठीच या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.



# प्रकाशाचे केंद्र

## करीमनगर आश्रम








आंध्र प्रदेशातील करीमनगर हे जिल्हा मुख्य केंद्र आणि मिशनच्या जुन्या केंद्रांपैकी एक केंद्र आहे. या व्यस्त शहरात दोन आश्रम आहेत. मनकाम्मा थोटा येथे जुना आश्रम असून नवीन आश्रम हैद्राबादला जाणाऱ्या एन एच ७ महामार्गाच्या पलिकडच्या बाजूस शहरापासून १५ कि.मी. दूर आहे. मार्च १९७५ मध्ये करीमनगर येथे सहजमार्ग प्रकाशात आला. सुरुवातीच्या काळात बंधू एन एस. राजू यांच्या निवासस्थानी सत्संग होत असे. दि. ४ जुलै १९७९ रोजी पूज्य बाबूजी महाराजांनी ध्यानकक्षासाठी परवानगी दिली.




## मनकम्मा, थोटा येथील आश्रम

सन १९८० मध्ये सुमारे १००० चौ.यार्ड जमीन खरेदी केली गेली आणि पूज्य गुरुदेवांनी जानेवारी १९८७ मध्ये आश्रम बांधण्यास परवानगी दिली. हे बांधकाम १९९० मध्ये पूर्ण झाले.

दि. ९ ऑक्टोबर १९९१ रोजी पू. गुरुदेवांच्या हस्ते आश्रमाचे उदघाटन झाले. हे आर. सी. सी. बांधकाम ९ गुंटा जमिनीवर करण्यात आले आहे. यात ५०*५०फ़ूटचे ध्यानकक्ष, स्वयंपाकघर, प्रसाधन घरे, शौचालय, ५०० पुस्तके, दृकश्रव्य सी.डी./डी.व्ही.डी इ. नी सज्ज वाचनालय आणि सर्व सुविधांनी सज्ज अशी पू. गुरुदेवांसाठी खोली इ.चा समावेश आहे.



## पार्थसारथीनगर येथील आश्रम

भोवताली घरे असलेल्या या आश्रमाचे उदघाटन पू. गुरुदेवांच्या हस्ते दि. ५ एप्रिल २००४ रोजी झाले. ही एकूण १६.५ एकर जमीन असून त्यातील ४.५ एकर जमिन आश्रमासाठी राखून ठेवण्यात आली आहे.



या आश्रमात सुमारे ३०० अभ्यासी बसू शकतील असे (५०*६० फ़ूट) क्षमतेचा ध्यानकक्ष, स्वयंपाकघर, भोजनकक्ष, वाचनालय आणि शौचालये आहेत. पू. गुरुदेवांसाठी सर्व सुविधांनी सज्ज असे निवासस्थान आहे. त्यालगतच अतिथींसाठी असलेली खोली आहे. गुरुदेव त्यांच्या उद्घाटनपर भाषणात म्हटले होते की, आपल्याला आपल्या घरातच वैकुंठ (स्वर्ग) हवे आहे. जर तुम्ही तुमचे हृदय विकसित केले तर तुम्ही वैकुंठात जाण्याऐवजी वैकुंठच तुमच्या घरी येईल आणि हे सहज शक्य होईल. पण ते तुमच्या हृदयावर अवलंबून आहे. असे हृदय विकसित करण्यासाठी तुम्हाला ह्या अश्या स्थानी आले पाहिजे.

मार्च १९८७, फ़ेब्रु १९८९, ऑक्टोबर १९९१, डिसें १९९४, ऑक्टो १९९७, फ़ेब्रु २००२ आणि अगदी अलिकडच्या काळात एप्रिल २००४ मध्ये अशी वारंवार गुरुदेवांनी करीमनगरला भेट दिली. त्यांच्या एका भेटीत ते म्हणाले होते कि, त्यांच्यासाठी करीमनगर हे करीबनगर आहे. म्हणजे त्यांच्या हृदयाच्या जवळ आहे. त्यांच्या भेटींमध्ये त्यांनी खूप भाषणे दिली. यात ते अधून-मधून तेलुगुतही बोलत असत. याचीच सर्वच अभ्यासींना प्रतिक्षा असे.

येथे दोन संपूर्ण दिवसांच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते. एक पार्थसारथी नगर आश्रम येथे महिन्याच्या दुसऱ्या रविवारी आणि दुसरा मनकम्मा थोटा आश्रम येथे महिन्याच्या शेवटच्या रविवारी. सुमारे २५० अभ्यासी आणि ७० मुले या मासिक संमेलनात नियमितपणे सहभागी होतात. एका व्याख्यानात पू. गुरुदेव म्हणाले होते, तर , मला आशा आहे की, येथे येऊन ध्यान करण्याची आवश्यकता तुम्हास समजते. शुद्धीकरणाने सारे जडत्व निघून जाऊन तुमचे हृदय विकसित होते. त्यामुळे हृदय हे असे स्थान बनेल की जिथे माझे गुरुदेव कायमचे वास्तव्य करतील. येथील सारे उपक्रम गुरुदेवांचे हे कथन ध्यानात ठेवूनच राबविले जातात.

**To download or subscribe to this newsletter, please visit http://www.sahajmarg.org/newsletter/india For feedback, suggestions and news articles please send email to in.newsletter@srcm.org**

© 2011 Shri Ram Chandra Mission ("SRCM"). All rights reserved. "Shri Ram Chandra Mission", "Sahaj Marg", "SRCM", "Constant Remembrance" and the Mission's Emblem are registered Trademarks of Shri Ram Chandra Mission.This Newsletter is intended exclusively for the members of SRCM. The views expressed in the various articles are provided by various volunteers and are not necessarily those of SRCM.